# माफसू यशोगाथा सादर करणेसाठी प्रारूप




प्रक्षेत्राचा फोटो



प्रक्षेत्रावर कार्यरत असतांनाचा फोटो



पासपोर्ट

## नैसर्गिक आपत्तीवर मात करीत गौरवने जिद्दीने साकारला मांसल कुक्कुटपालन व्यवसाय

## यशोगाथा विस्तृत स्वरूपात

गौरव अनिलराव खोडे, मु.पो.कोटंबा, ता. बाभूळगांव जि. यवतमाळ – ४४५ १०१, मोबाईल क्रमांक ८७६७१४५३३२, ईमेल – gkhode17@gmail.com, शिक्षण बिएस्सी, वय – ३४ वर्ष. कुटुंबाचा पारंपारिक मुख्य व्यवसाय शेती आहे. वडिलांचे २०१७ मध्ये निधन झाले. आई, धाकटा भाऊ आणि गौरव असे तिघे कुटुंबाकडे असलेली ६.५ एकर शेती आणि मक्तेदारीने २५ एकर शेती करून वार्षिक ४ लाख रूपये शेती उत्पन्नातून मिळवतात. सोबत भाडेतत्वावर ट्रॅक्टर देवून वार्षिक सरासरी ७०००० रूपये त्यांना प्राप्त होते. शेतीसोबत गौरव मांसल कुक्कुटपालन करतो. नोकरीसाठी किंवा इतर व्यवसायासाठी त्याने प्रयत्न केले नाहीत.

शेतीपूरक व्यवसायाबाबत आधीपासूनच त्यास आकर्षण होते. पारंपारिक शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही अशी त्याची धारणा बनली होती. शेतपिकातून मिळणा–या उत्पन्नासाठी हंगाम किंवा वर्षभर वाट पहावी लागते. मांसल कुक्कुट पालनात गुंतवणूकीचा परतावा लवकर परत मिळतो तसेच त्याबाबत प्रशिक्षित आहे म्हणून मांसल कुक्कुटपालन करण्याचा सल्ला डॉ. नरेंद्र खोडे, सहायक प्राध्यापक, पवैम, उदगीर यांनी त्यास दिला. यामुळे गौरवने मांसल कुक्कुटपालन व्यवसायाची निवड केली. कोविड टाळेबंदी काळात दि. २१ ते २५ सप्टेंबर २०२० या दरम्यान पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीरने आयोजित केलेल्या पाच दिवसीय आभासी मांसल कुक्कुटपालन प्रशिक्षणात सहभाग घेतला. प्रशिक्षणातून शेडचे बांधकाम, एक दिवसांच्या पिल्लांची खरेदी, व्यवसायास लागणारे साहित्य / उपकरणे, ब्रुडींग व्यवस्थापन, खाद्य व्यवस्थापन, लसीकरण, दैनंदिन व्यवस्थापन, औषधोपचार, जैवसुरक्षा, आर्थिक विश्लेषण, आदीबाबीविषयी माहिती मिळाली आणि त्याच्यात मांसल कुक्कुटपालन व्यवसाय करू शकू असा आत्मविश्वास निर्माण झाला. त्याच्या स्वत:च्या शेतातच ३० बाय २०० चौरस फूट आकारमानाचे ६००० पक्षी ठेवता येईल असे शेडचे बांधकाम २०२१ मध्ये सुरू केले. शेड उभारणी, वीज जोडणी, उपकरणे आदी करीता २२ लाख रूपये इतकी गुंतवणूक लागली. भारतीय स्टेट बॅंक, बाभुळगांव शाखेचे व्यवस्थापक श्री. अभिषेक भालेकर आणि आणि श्री. संदिप धस, शाखा व्यवस्थापक यांच्या सहकार्यातून ८ लाखाचे अर्थसहाय्य मिळाले. त्याने कोणतेही अनुदान न घेता इतर आवश्यक भांडवल टप्प्याटप्प्याने शेतीउत्पन्नातून उभे केले. शेतीसोबत त्याचा धाकटा भाऊ सौरव खोडे मांसल कुक्कटपालन व्यवसायाची दैनंदिन कामे सांभाळण्यास मदत करतो. तसेच एक रोजंदार शेतीकामासोबत कुक्कटपालन व्यवसायात मदत

करतो. वर्ष २०२१ मध्ये गारपीट आणि २०२२ मध्ये अतिवृष्टी अशा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीतून अपेक्षित उत्पन्न न मिळाल्यामुळे मार्च २०२३ मध्ये शेड विलंबाने पुर्णत्वास आले. नैसर्गिक आपत्तीमुळे त्याची आर्थिक घडी विस्कटली होती. मात्र वर्ष २०२३ मध्ये शेतीतून समाधानकारक उत्पन्न मिळाले तसेच बॅकेकडून प्राप्त अर्थ सहाय्यातून शेड उभे राहीले.

सद्यस्थितीत गौरव हा वेंकटेश्वरा हॅचरीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीसोबत करार पद्धतीने कुक्कुटपालन व्यवसाय करीत आहे. कंपनीद्वारे लसीकरण केलेले पिल्लं, खाद्य, औषधी, आरोग्य सेवा आणि मांसल (ब्रॉयलर) पक्ष्यांची विक्री केली जाते. आजतागायत कंपनीसोबत करार पद्धतीने त्याच्या चार बॅचेस निघाल्या असून प्रति बॅच खर्च वजा जाता सरासरी ६०००० रूपये गौरवला मिळत आहेत. म्हणजेच मासिक ३०००० रूपये उत्पन्न होत आहे.

प्रशिक्षण, योग्य व्यवस्थापन, मेहनत आणि चिकाटी हेच गौरवच्या यशाचे सुत्र आहे असे तो मानतो. भविष्यात फार्मचे क्षेत्र वाढविणे. सोबत दुग्धव्यवसाय करण्याचे त्याचे नियोजन आहे. कुक्कुटपालन हा व्यवसाय केल्यामुळे त्याचे हाताला बारमाही काम राहते. शेतीसोबत नियमित अर्थाजन त्याला प्राप्त होत आहे. एक शेतकरी म्हणून त्याची ओळख होती आता मात्र एक व्यावसायिक शेतकरी म्हणून त्याला समाजात स्थान प्राप्त झाले आहे. नैसर्गिक आपत्तीपुढे न हरता जिद्दीने आणि चिकाटीने संकटाचा सामना करण्यास प्रोत्साहित केल्याबद्धल त्याचा धाकटा भाऊ सौरव खोडे आणि व्यवसायातील सर्व माहिती, कौशल्ये आणि बारकावे याबाबत प्रशिक्षण तसेच सातत्याने शेडला भेटी, बॅकेचा प्रकल्प अहवाल तयार करून देणे तसेच बॅकेकडून कर्ज मिळण्यासाठी मदत करणे याकरीता डॉ. नरेन्द्र खोडे आणि डॉ. राम कुलकणी यांना तो यशाचे श्रेय देतो. निसर्गावर आधारित शेती करीत असतांना होणा-या संभाव्य आर्थिक नुकसानाला तोंड देण्यासाठी कुक्कुटपालन, शेळीपालन इ. शेतीपूरक व्यवसायाकडे युवकांनी वळावे आणि अशा शेतीपूरक व्यवसायाची इत्यंभूत शास्त्रीय माहिती प्रशिक्षणाच्या माध्यमातून घेवून शाश्वत अर्थाजनाचा मार्ग निवडावा असा सल्ला ते युवकांना देतात.


| | | |
|---|---|---|
| **मार्गदर्शक १**<br>नांव, पदनाम, महाविद्यालयाचे नाव, संपर्क क्र. | डॉ. नरेन्द्र खोडे,<br>सहायक प्राध्यापक,<br>पशुवैद्यकीय विस्तार शिक्षण विभाग, पवैम, उदगीर<br>८६६८९४७२५० | यशस्वी व्यावसायिकाच नांव – गौरव अनिलराव खोडे<br>पत्ता – मु. पो. कोटंबा, ता. बाभूळगांव जि. यवतमाळ – ४४५ १०१<br>मोबाईल नंबर – ८७६७१४५३३२<br>ईमेल – gkhode17@gmail.com<br>शिक्षण – बिएस्सी<br>जन्म तारीख –१७.०४. १९८९<br>वय – ३४ वर्ष |
| **मार्गदर्शक २**<br>नांव, पदनाम, महाविद्यालयाचे नाव, संपर्क क्र. | डॉ. राम कुलकर्णी<br>सहायक प्राध्यापक,<br>कुक्कुटपालनशास्त्र विभाग, पवैम, उदगीर<br>७७७६८७१८०० | |






2023/12/17 11:35






पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय
प्रशिक्षण प्रमाणपत्र
गौरव अनिलराव खोंडे
मांसल (ब्रॉयलर) कुक्कुटपालन प्रशिक्षण
त्याकरीता हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे